27/09/2019
Friday

Topic- 3 राजर्षी शाहू महाराज

प्रस्तावना :-

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणारा 'पुरोगामी लोकराजा' म्हणून छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते.
राजर्षी शाहूंच्या कर्तृत्वामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित न राहता ते संपूर्ण भारतभर लोकप्रिय झाले. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अनेक वर्षे श्रेष्ठ जातींनी आपले वर्चस्व टिकवण्यासाठी बहुजन समाजावरती अनेक प्रकारची सामाजिक व धार्मिक बंधने लादली होती. अशा बंधनामधून बहुजन समाजाला मुक्त करुन त्यांना सुशिक्षित, जागृत व प्रगत बनवण्याचे कार्य राजर्षी शाहूंनी केले. शाहूंच्या कार्यावरती अनेकवेळा टिका झाली. मात्र त्यांनी आपल्या कार्यपद्धतीमध्ये, ध्येयधोरणांमध्ये बदल केला नाही. असामान्य व्यक्तिमत्वाचा एक आदर्श राजा, बहुजन समाजाच्या लोकनेता, सामान्य जनतेचा लोकराजा म्हणून राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते.

★ राजर्षी शाहू महाराज यांचा जीवनपरिचय :-

राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म 26 जून 1874 मध्ये कागल या ठिकाणी घाटगे घराण्यामध्ये झाला.
राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत असे होते. त्यांच्या जनक पित्याचे नाव जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाईसाहेब असे होते. कोल्हापूर जिल्ह्यातील कागलचे घाटगे घराणे आपल्या पराक्रमासाठी प्रसिद्ध होते.
सन 1710 मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती दुसरे शिवाजी, छत्रपती तिसरे शिवाजी आबासाहेब महाराज, बाबासाहेब महाराज, छत्रपती चौथे शिवाजी हे कर्तबगार राजे झालेले आहेत.

छत्रपती चौथे शिवाजी यांना मनोरुग्ण ठरवून इंग्रजांनी त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात कैद करून ठेवले होते. या कालावधीत छत्रपतींचा राज्यकारभाराशी संपर्क मुख्याने कोल्हापुरचे रिजंट म्हणून कागलच्या जयसिंगराव घाटगे यांची नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांच्या या कार्यामुळे समाजात विश्वास निर्माण झालेला होता. याच वेळी कोल्हापुरचे छत्रपती चौथे शिवाजी यांचे अहमदनगरच्या किल्ल्यात निधन झाले. ते निपुत्रिक असल्याने राज्यकारभार चालवण्यासाठी दत्तक घेण्याची गरज निर्माण झाली. चौथे शिवाजी महाराजांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे ज्येष्ठ पुत्र यशवंत यांना 17 मार्च १८८४ मध्ये दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर यशवंत यांना 'शाहू महाराज' या नावाने ओळखण्यात येऊ लागले. शाहू महाराज हे कोल्हापुर संस्थानाचे वारसदार बनले.

शाहू महाराजांच्या कोल्हापुर संस्थानमधील दत्तक विधानापूर्वीच शिक्षणास प्रारंभ झालेला होता. श्री कृष्णाजी गोखले, श्री हरिपंत गोखले व फिटझिराल्ड हे त्यांना शिक्षण देत होते. शाहूंना पुढील शिक्षणासाठी राजकुमारासाठी शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या राजकोट येथील महाविद्यालयात दाखल करण्यात आले. सन १८८५ ते १८८९ या कालावधीत 'मॅकनॉटन' यांच्या मार्गदर्शनाखाली शाहूंना आपले शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी भाषा, राज्यकारभार संपुर्ण जगाचा इतिहास, भुगोल याविषयांचे शिक्षण याठिकाणी शाहूंना मिळाले. १ एप्रिल १८९४ या कालावधीत धारवाड या ठिकाणी 'सर एस. एम. फ्रेजर' यांच्या मार्गदर्शनाखाली शाहूंनी पुढील शिक्षण पुर्ण केले. इंग्रजी भाषा राज्यकारभार संपुर्ण जगाचा इतिहास, भुगोल या

यानंतर सन १८९० ते १८९४ या कालावधीत धारवाड या ठिकाणी 'सर एस. एम. फ्रेजर' यांच्या मार्गदर्शनाखाली शाहूंनी पुढील शिक्षण पुरे केले. इंग्रजी भाषा राज्यकारभार संपुर्ण जगाचा इतिहास, भुगोल याविषयांचे शिक्षण याठिकाणी



Scanned with CamScanner

शाहूंना मिळाले. १ एप्रिल १८९१ मध्ये बडोद्याचे सरकार गुणाजीराव खानविलकर यांची कन्या 'लक्ष्मीबाईसाहेब' यांच्याशी शाहूंचा विवाह झाला. शिक्षण पुर्ण झाल्यानंतर २ एप्रिल १८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानाची राज्यकारभाराची सूत्रे स्विकारली. आपल्या अधिकारांच्या आणि सत्तेचा वापर बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी शाहूंनी केला. बहुजन समाजाचे नेतृत्व त्यांनी स्विकारले. राजर्षी शाहूंनी आपल्या कारकिर्दित अनेक समाज उपयोगी कामे पुर्ण केली. सामाजिक विषमता दुर करुन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

शाहूंच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे ___

## (A) मागासवर्गीय / कनिष्ठ जातींचा शैक्षणिक व सामाजिक उद्धार -

प्रस्तावना :-

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी नियोजन पुर्वक केलेल्या सर्वांगिण सुधारणांमुळे कोल्हापुर संस्थानाबरोबरच संपुर्ण महाराष्ट्रात सामाजिक क्रांती घडून येण्यास सुरुवात झाली. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या एकुण कार्यात शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. सामाजिक परिवर्तन घडवुन आणण्यासाठी शिक्षण हाच महत्त्वपुर्ण घटक आहे याची जाणीव त्यांना झालेली होती. शाहू महाराजांनी ज्यावेळी कोल्हापुर संस्थानाचा प्रत्यक्ष राज्यकारभार स्विकारला त्यावेळी समाज-व्यवस्थेमध्ये जातीयता, अस्पृश्यता अधिक प्रमाणात प्रबळ झालेल्या होत्या. विषमतेच्या आधारावर वरिष्ठ जातींनी कनिष्ठ व मागासजातींवरती अनेक बंधने लादलेली होती. कनिष्ठ व मागासजाती सर्व प्रकारच्या अधिकारांपासुन वंचित असल्यामुळे त्यांची अवस्था अत्यंत दारिद्र्यमय अज्ञानी, दयनिय स्वरुपाची झालेली होती. अश्या परिस्थितीमधुन या कनिष्ठ व मागासवर्गीय लोकांची प्रगती साधण्यासाठी त्यांचा उद्धार करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न सुरु केले. राजर्षी शाहूंच्या या प्रयत्नांमधुनच कनिष्ठ व मागासवर्गाची उन्नती घडुन येण्यास सुरुवात झाली अश्या प्रकारच्या सुधारणा घडवुन करण्यासाठी राजर्षी शाहूंनी केलेले प्रयत्न पुढीलप्रमाणे ___

1] कनिष्ठ किंवा मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाचा प्रसार -

कनिष्ठ मागास जातींमध्ये असलेल्या शैक्षणिक मागासलेपणाची जाणीव लहानपणी शाहूंना होती. केवळ शिक्षणाच्या जोरावरच या लोकांचा विकास घडून येईल अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळेच त्यांनी मागासवर्गीय शोषित, दलित ~~घटक~~ घटकांमध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. विशेषत: प्राथमिक शिक्षणासाठी त्यांनी सर्वप्रथम मागासवर्गीय मुलांसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने 28/मे/1913 मध्ये एक विशेष आदेश काढला होता. त्यानुसार प्रत्येक खेड्यात किंवा गावात किमान एक विशेष शाळा स्थापन करून त्या गावातील बहुसंख्य जातीमधील व्यक्तीची शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. या आदेशानुसार प्राथमिक शिक्षणात क्रांतिकारक स्वरूपाचे बदल होऊ लागले. मागासवर्गीय जातींमधील मुलांना शिक्षणाविषयी आपुलकी निर्माण होऊ लागली. राजर्षी शाहूंनी सर्वप्रथम कनिष्ठ मागासलेल्या जातींमध्ये शिक्षणप्रसाराला महत्त्व दिले.

16/10/2019 Wed.

2] प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे :-

शाहू महाराज यांनी 1918 मध्ये एक आदेश काढून सर्व जाती-धर्मातील मुलां-मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. प्राथमिक शाळांच्या वाढत्या संख्येबरोबर शिक्षकही वाढणार याची जाणीव ठेवून जून 1918 पासून शिक्षकांची परीक्षा होण्यास सुरुवात केली. शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी 1918 मध्ये शिक्षणविषयक कराचा कायदा मंजूर केला. बहुजन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्राथमिक शिक्षणाद्वारे व्यापक बैठक निर्माण करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

3] अस्पृश्यांसाठी शिक्षण :-

शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे स्विकारली. त्यावेळी अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील शिक्षणाचा दर्जा अत्यंत अल्प मागासलेला होता. अस्पृश्य कुटुंबातील मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे पुढे प्रवेश घेता येत नव्हता.



Scanned with CamScanner

अश्या अस्पृश्य समाजातील मुलांसाठी शाहू महाराजांनी सन 1908 मध्ये 'मिस क्लार्क' या नावाने वसतीगृह सुरु केले. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे अस्पृश्यांसाठी असणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद करण्याचा निर्णय 1919 मध्ये घेण्यात आला. इतर मुलांबरोबर सरकारी शाळेमध्ये त्यांना सहभागी करुन घेण्यात आले. सरकारी शाळा, कार्यालय याठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजात जाणीवजागृती व आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

4) मागासजातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती –

शाहू महाराजांनी आपल्या मुलाच्या स्मरणार्थ अस्पृश्य समाजातील मुलांना शिष्यवृत्ती सुरु केली. अस्पृश्य दलित जातीतील विद्यार्थ्यांचे शुल्क माफ केले. अस्पृश्य मुलींसाठी शिष्यवृत्ती राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या. अशा प्रकारे अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना मदत करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले.

5) वसतीगृहांची निर्मिती –

गरिब आर्थिक परिस्थितीमुळे मागास व कनिष्ठ समाजातील मुलांना माध्यमिक शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. हे महाराजांच्या लक्षात आल्यानंतर दलित मागास व कनिष्ठ समाजातील मुलांसाठी शाहू महाराजांनी सन 1908 मध्ये 'मिस क्लार्क' या नावाने वसतीगृह सुरु केले.
मराठा, जैन, नामिक अशा विविध जाती धर्माच्या मुलांसाठी कोल्हापुर याठिकाणी वसतीगृहांची स्थापना करण्यात आली.



Scanned with CamScanner

6] कनिष्ठ जातींना आरक्षण

उच्च शिक्षण घेण्याचा अधिकार केवळ उच्च अशा वरिष्ठ जातींना असल्यामुळे सरकारी सेवेमध्येदेखील याच वर्गातील लोकांची मक्तेदारी निर्माण झालेली होती. सरकारी नोकरी प्रशासन यापासुन कनिष्ठ जाती वंचित होत्या. ही विषमता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी एक २६ जुलै १९२० मध्ये क्रांतिकारी स्वरुपाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. या जाहिरनाम्यानुसार सरकारी नोकरीतील ५०% जागा मागासवर्गीय लोकांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या. या निर्णयामुळे मागास जातीतील लोकांचे शासकीय नोकरीतील लोकांचे प्रमाण वाढीस लागले.

7] अस्पृश्य उद्धार -

जातीभेद हा राष्ट्रीय एकतेतील मोठा अडथळा असल्याची जाणीव शाहू महाराजांना होती. अस्पृश्यता हा कलंक दुर करण्यासाठी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी विविध सोयी सुविधा सवलती देवुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. अस्पृश्य मुलांसाठी असणाऱ्या स्वतंत्र शाळा बंद करुन सर्व सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने अस्पृश्य मुलांना सहभागी करुन घेतले. अस्पृश्य मुलांसाठी १९०८ मध्ये स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना केली. शाळेत सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता मानु नये सर्वांना समान वागणुक देण्यात यावी असा हुकुम काढण्यात आला. आपल्या कन्येच्या विवाह प्रसंगी सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य जातीला कोचमन म्हणुन बसवले. १९१९ च्या कायद्याने कोल्हापुर संस्थानात अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्यात आलेली होती. सर्व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्य लोकांसाठी खुली करण्यात झालेली होती. स्वत: अस्पृश्यांसोबत खान-पान, भोजन करुन अस्पृश्यता निर्मुलनाचा आदर्श सर्वांना घालुन दिला.

8] वेठबिगारी व वेठबेगारी पद्धत बंद :

अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश २५ जुलै १९१८ ला मंजुर झाला. आणि तो ३ ऑगस्ट १९१८ मध्ये प्रसिद्ध झाला.



Scanned with CamScanner

या आदेशानुसार अस्पृश्य अशा जातींवरती लादलेली हजेरी देण्याची पद्धत बंद करण्यात आली. या आदेशामुळे या जातीतील लोकांना रोज पोलिस स्टेशनमध्ये जाऊन हजेरी देण्याचे बंधन नष्ट करण्यात आले.

त्याचबरोबर बलुतेदारी व अलुतेदारी ही पद्धत कायद्याने बंद करण्यात आली. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस 100 रु. आर्थिक दंड व 4 दिवसांची शिक्षा ही तरतुद करण्यात आली. केवळ कनिष्ठ मागास जातीमधील म्हणून या लोकांवरती जी बंधने घालण्यात आलेली होती. अमानुष जाचक बंधने नष्ट करण्याचे काम शाहु महाराजांनी केले.

9] वेठवलपिद्धत बंद :-

मागास व कनिष्ठ ठरवलेल्या गेलेल्या जातीमधील महार या जातीमधील लोकांवरती वेठवला ही अमानुष प्रथा लादण्यात आलेली होती. या प्रथेनुसार पाटील व कुलकर्णी या सरकारी लोकांची कामे विना मोबदला करावी लागत असत. अशा प्रकारची गुलामगिरी नष्ट करण्याचे काम शाहु महाराजांनी केले. त्यांनी वेठवला ही पद्धत बंद केली.

10] सारांश :-

राजर्षी शाहु महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखुन मागासलेल्या कनिष्ठ जातीतील लोकांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांचा उद्धार करण्याचे महत्त्वपुर्ण कार्य केले. सामाजिकदृष्ट्या जी बंधने या जातीवरती लादण्यात आलेली होती. त्यासर्व बंधनातुन अस्पृश्य समाजाला मुक्त सर्व सामान्य ~~लोकांसारखे~~ लोकांप्रमाणे समान अधिकार देऊन त्यांचा सामाजिक उद्धार करण्याचे कार्य शाहु महाराजांनी केले.

## B) स्त्रियांचा हक्क व अधिकार -

प्रस्तावना -

पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात होती. बालविवाह-केशवपन, शिक्षणबंदी यांसारख्या असंख्य रुढी व प्रथांनी स्त्रियांना असहाय्य बनवले होते. स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे सर्वप्रथम कार्य महात्मा फुले यांनी केले. यानंतरच्या काळात राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यतेवारे व जातीयतेचे निर्मुलन यांसारखेच महत्व स्त्रियांच्या न्याय व हक्कांना व सर्वांगीण कल्याणाला दिले होते. स्त्रियांचे हक्क सुरक्षित रहावे या हेतूने यापल्या संस्थानात शाहू महाराजांनी काही कायदे निर्माण केले होते. शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे रक्षण करण्याचे महत्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले ते पुढीलप्रमाणे -

### 1] सक्तीची विवाहनोंदणी कायदा -

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विवाह-संबंधीच्या कायद्यानुसार विवाह नोंदणी सक्तीची केली होती. विवाहाच्या वेळी वधूचे वय १८ वर्षे व ~~वधूचे~~ वराचे वय २५ वर्षे असले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला होता. त्याचबरोबर १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या वधूस विवाहसाठी पालकांच्या संमतीची गरज नव्हती. स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या कायद्यानुसार देण्यात आले होते. प्रस्तुत कायदा म्हणजे स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे क्रांतिकारक पाऊल होते.

### 2] विधवा पुनर्विवाह कायदा -

मागासलेल्या समाजामध्ये अनेक जातींमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु उच्चवर्णीय समाजातील जातींना मात्र विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हते. शाहू महाराजांनी या अन्यायाशी प्रथम धक्का देऊन जुलै १९१७ मध्ये विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला.



Scanned with CamScanner

विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत ज्या अडचणी होत्या. त्या कायद्याने दूर करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला.

## ब) पडदा पद्धतीचा निषेध –

महाराष्ट्रातील उच्चवर्णीय विशेषतः राजघराणी, मराठा सरदार व वतनदार घराणी यांच्यात पडदा पद्धत अस्तित्वात होती. पडदा पद्धत म्हणजे स्त्रियामधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपून टाकणारी प्रथा आहे, असे मत राजर्षी शाहू महाराज यांचे होते. त्यांनी या पडदा पद्धतीचा निषेध केला. पडदा पद्धतीने स्त्रियांना त्यांचा पराक्रम, शूरपणा कसा दाखवता येईल, त्यामुळे ही प्रथा नष्ट करण्यासाठी या पद्धतीचा शाहू महाराजांनी निषेध केला होता. स्त्रियांना देखील मुक्तपणे स्वाभाविकपणे जीवन जगण्याचा हक्क आहे. आणि तो त्यांना मिळाला पाहिजे. या तत्वाचा शाहूंनी पुरस्कार केला होता.

## 4) आंतरजातीय विवाह कायदा –

12 जुलै 1919 मध्ये आंतरजातीय विवाह कायदा कोल्हापूर गॅझेट मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन या मुख्य धर्माच्या लोकांना जातीभेद न पाळता आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा देण्यात आलेली होती. याशिवाय या कायद्यातील महत्वाची तरतूद म्हणजे विवाहाच्या वेळी मुलांचे वय 18 वर्षे व स्त्रीचे वय 14 वर्षे पुर्ण असले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला होता. याचा परिणाम बालविवाह या प्रथेला प्रखरपणे विरोध करण्यात आला. या नवीन कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देण्यासाठी शाहू महाराजांनी एक खास 'विवाह नोंदणी अधिकार' नियुक्त केला होता.



Scanned with CamScanner

5) संमती वयाचा कायदा -

ब्रिटिश सरकारने मोठ्या धाडसाने संमती वयाचा कायदा १८९१ मध्ये मंजुर करून घेतला होता. मुलीचे संयोग वय किमान दहा ऐवजी बारा वर्षे असावे असा दंडक घालण्यात आला होता. हा कायदा हिंदू धर्मात हस्तक्षेप करणारा आहे. अशी भूमिका परंपरानिष्ठ लोकांनी घेवून या कायद्याला प्रखर विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर विवाहप्रसंगी मुलीचे वय किमान १४ वर्षे असावे, असे ~~आग्रहाने~~ सांगणारा शाहू महाराजांचा कायदा हा ब्रिटिशांच्या कायद्यापेक्षा अधिक पुरोगामी होता हे यावरून स्पष्ट होते.

6) क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा -

अनेक कुटुंबामध्ये स्त्रियांना तिचे पती व नातेवाईक यांच्याकडून मोठ्या प्रमाणात छळ केला जात होता. अशा अपराध्यांना त्यावेळी इंडियन पिनल कोड सुद्धा काही शिक्षा करू शकत नव्हते. शाहू महाराजांनी या अत्याचारापासून स्त्रियांची सोडवणूक करण्यासाठी २ ऑगस्ट १०१९ मध्ये सर्वसमावेशक कायदा मंजुर केला. पुरुषवर्गाकडून स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी शाहू महाराजांनी हा कायदा मंजुर केला होता. या कायद्यानुसार स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्याला ६ महिने कारावास व २०० रु. दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आलेली होती.

7) घटस्फोटाचा व वारसा हक्क कायदा -

शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात घटस्फोट-संबंधीचा कायदा मंजुर केला होता. स्त्रियांना त्यांच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर खर्चाची योग्य व्यवस्था कशी करता येईल, संतती असेल तर त्याची व्यवस्था अशा सर्व गोष्टींची दखल घेऊन घटस्फोटासंबंधीचा कायदा तयार करण्यात आलेला होता.

या कायद्यातील महत्वाची तरतूद म्हणजे काही जातींमध्ये ~~ग्राम~~ जात ~~ग्राम~~ पंचायतीच्या आधारे घटस्फोट दिले जात होते. जातपंचायतीचे हे अधिकार काढून घेण्यात आले. कौटुंबिक स्तरावरती होणाऱ्या

अत्याचारापासून स्त्रियांची सुरक्षा करण्यासाठी हा कायदा करण्यात आला होता.

शाहू महाराजांनी जानेवारी १९२० मध्ये वारसा हक्काच्या कायद्यात महत्त्वपूर्ण बदल केले. सर्व वर्गांच्या जातींच्या संततींना आपल्या वडिलांच्या मिळकतीत वारसा हक्क देण्यात आला. स्त्रियांच्या उद्धाराच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वपूर्ण ठरला.

६) देवदासी प्रथा - प्रतिबंध कायदा :

देवाच्या नावावर मुली सोडण्याच्या प्रथेतून देवदासी या वर्गाची निर्मिती होत होती. जोगतीन, मुरळी, भाविन असे अनेक प्रकार त्यामध्ये होते. देवदासी प्रथा ही एक स्त्रीयांवरती अन्याय करणारी प्रथा होती. राजर्षी शाहू महाराजांनी १७ जाने. १९२० मध्ये विशेष कायदा करून आपल्या संस्थानातील देवदासींच्या प्रथेवर प्रतिबंध करणारा कायदा मंजूर केला. इतर स्त्रीयांप्रमाणे देवदासी स्त्रियांना देखील अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

* सारांश -

राजर्षी शाहू महाराजांनी वरीलप्रमाणे केलेल्या सर्व कायदे स्त्रियांचे हक्क व अधिकारांचे संरक्षण करणारे कायदे होते. शाहू कालखंडात ब्रिटिश राजवटीतदेखील स्त्रीयांच्या हक्कांचे संरक्षण करणारे कायदे नव्हते परंतु राजर्षी शाहूंनी स्त्रियांच्या कल्याणासाठी अनेक कायदे निर्माण केले यावरूनच स्त्री उद्धाराबाबत शाहू महाराजांची पुरोगामी विचारांची दृष्टी दिसून येते.

॥

22/10/2019

## (e) वसतिगृह चळवळ -

**प्रस्तावना -**

भारतातील बहुजन समाज हा शेकडो वर्षे शिक्षणापासून वंचित राहिला होता. अश्या बहुजन समाजामध्ये शिक्षणप्रसाराचे कार्य सर्वप्रथम महात्मा फुले व त्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाला संपूर्ण देशामध्ये वसतिगृहांची जननी किंवा वसतिगृहांची भूमी असा नावलौकिक प्राप्त करुन दिला. शाहूंच्या महत्त्वपूर्ण कार्यापैकी विशेष उल्लेख केला जातो तो म्हणजे वसतिगृह चळवळीचा. या चळवळीचा अर्थ, स्वरुप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1] वसतिगृह चळवळीची पार्श्वभूमी :**

माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध असूनदेखील ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतात. याची कारणे शोधल्यानंतर शाहूंच्या लक्षात आले कि, बहुजन समाजातील या विद्यार्थ्यांची शहरात भोजनाची व निवासाची अवस्था होत नाही. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे.

शाहूंना या परिस्थितीची जाणीव झाल्यानंतर त्यांनी प्रारंभी आपल्या राजवाड्यावरतीच अश्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय केली. परंतु राजवाड्यावरती मिळणाऱ्या सुविधा यांमुळे विद्यार्थी आळशी बनू लागले. त्यामुळे शाहूंनी तो प्रयोग बंद केला, व त्यानंतर सन 1896 मध्ये कोल्हापूर मधील राजाराम कॉलेज याठिकाणी एक वसतिगृह स्थापन करण्यात आले. सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांना त्या वसतिगृहामध्ये प्रवेश देण्यात आला. परंतु त्या ठिकाणी देखील केवळ ब्राम्हण विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याचे लक्षात आले. या सर्व घटनांचा परिणाम राजर्षी शाहू महाराजांनी ते वसतिगृह बंद करुन एक क्रांतिकारी निर्णय घेतला, तो म्हणजे प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन करण्याचा होय. यामधूनच वसतिगृह चळवळीचा पाया घातला गेला.

२) व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग -

ग्रामीण भागातील बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाच्या व निवासाच्या दृष्टीने कोल्हापुरमध्ये १८ एप्रिल १९०१ 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' या कोल्हापूर मध्ये पहिल्या मराठा वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. पी. सी. पाटील हे या वसतिगृहाचे पहिले विद्यार्थी होय. या वसतिगृहाचे मराठा असे नाव जातीविशिष्ट ठेवले असले तरी त्याठिकाणी मुस्लिम, शिंपी, कोळी, माळी अशा बहुजन समाजातील इतर जातींच्या मुलांना देखील आश्रय देण्यात आला होता. वसतिगृहांची ही संकल्पना त्या काळातील महाराष्ट्राच्या समाजकारणातील अत्यंत अभिनव कल्पना होती. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध जातींनी आपापल्या जातीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व राहण्याची जबाबदारी घेऊन कमीत कमी खर्चात वसतिगृह चालवणे ही शाहूंची भूमिका होती. वसतिगृह चळवळी मधील पहिले वसतिगृह म्हणून व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग या वसतिगृहाला ओळखले जाते.

३) दिगंबर जैन वसतिगृह;

१९०१ मध्ये निपाणी या ठिकाणी जैन धर्मियांची एक परिषद आयोजित करण्यात आलेली होती. शाहूंनी त्या परिषदेस आपला प्रतिनिधी पाठवून जैन लोकांनी जैन मुलांच्या कल्याणासाठी कोल्हापूर मध्ये एखादे वसतिगृह सुरू करावे असा संदेश पाठवला. या संदेशाने प्रभावित होऊन जैन लोकांच्या पुढाकाराने कोल्हापूर मध्ये 'दिगंबर जैन वसतिगृह' सुरू करण्यात आले.

४) मिस क्लार्क वसतिगृह -

अस्पृश्य समाजातील मुलांच्या शैक्षणिक उद्धारासाठी शाहूंनी अनेक प्रयत्न केले. अस्पृश्य समाजातील मुलांसाठी १९०८ मध्ये 'मिस क्लार्क वसतिगृह' या स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना केली.

5) <u>वसतिगृह ही एक लोकचळवळ</u> :-

शाहू महाराज कोणतीही सामाजिक निर्णय घेत असताना, सामाजिक परिस्थितीचा पूर्ण अभ्यास करूनच निर्णय घेत असत. वसतिगृह स्थापन करत असताना ज्या जातींसाठी वसतिगृह स्थापन करायचे त्या जातीतील लोकांशी संपर्क साधुन त्यांना प्रेरित करत असत, यामधूनच कोल्हापूरमध्ये वसतिगृह ही केवळ कोल्हापूर पुरती मर्यादित न राहता ती एक लोकचळवळ निर्माण झाली. कोल्हापूर व कोल्हापूरच्या बाहेर अनेक ठिकाणी अनेक वसतिगृहांची स्थापना करण्यात आली. त्यातील काही उदाहरणे — पुढीलप्रमाणे ——

1) मुस्लिम वसतिगृह — 1906
2) लिंगायत —— 1907
3) नामदेव —— 1911
4) कायस्थ प्रभु —— 1912
5) सारस्वत वसतिगृह — 1912
5) इंडियन ख्रिश्चन होस्टेल — 1915
6) वैश्य बोर्डिंग — 1918
7) ढोर-चांभार बोर्डिंग — 1919
8) शाहू वैदिक बोर्डिंग 1920
9) सुतार बोर्डिंग — 1921
10) नाभिक बोर्डिंग — 1921

यांसारख्या अनेक वसतिगृहांची स्थापना शाहूंनी कोल्हापूर मध्ये केली त्याबरोबरच पुणे, नाशिक, अहमदनगर, पंढरपूर, नागपूर या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्यासाठी आर्थिक मदत केली. शाहूंनी वसतिगृहांना जो आश्रय दिला, त्यामुळे त्याचे हळूहळू लोकचळवळी मध्ये आकलेन होते.

6] जातिय वसतिगृहांच्या स्थापनेमागे शाहूंची राष्ट्रीय दृष्टी :

कोल्हापूर मध्ये निरनिराळ्या जातींसाठी वसतिगृह स्थापन करून शाहूंनी जातीयता निर्माण केली, अश्याप्रकारची टिका शाहूंच्यावर केली जात होती. परंतु जातीनुसार वसतिगृहांची स्थापना करण्यामागे शाहूंची राष्ट्रीय दूरदृष्टी होती. कारण आपल्या जातीसाठी वसतिगृह स्थापन केल्यामुळे त्या त्या जातीतील दानशूर लोक पुढे येतील, व या कार्यासाठी मदत करतील त्यामधूनच जाती-जाती मध्ये समानतेची भावना निर्माण होईल, राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागेल. अश्या प्रकारची दूरदृष्टी शाहू महाराजांची होती.

7] कोल्हापूर - वसतिगृहांची जननी :

वसतिगृहांची चळवळ कोल्हापूरच्या बाहेर विस्तारित होत गेली. त्याचे श्रेय स्वत:कडे न घेता शाहूंनी ते आपल्या संस्थानातील शिक्षणप्रेमी लोकांना दिले. 1920 मध्ये नाशिक येथिल श्री. उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी शाहूंनी असे म्हटले होते कि, ब्रिटिश पार्लमेंट ला 'मदर ऑफ पार्लमेंट्स', असे मोठ्या अभिमानाने म्हटले जाते, त्याप्रमाणे कोल्हापूरला वसतिगृहांची जननी, वसतिगृहांची भूमी असे म्हटले जाऊ लागले आहे.

8] सारांश :

शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीला जो राजाश्रय मिळाला त्यामुळे वसतिगृहांची चळवळ कोल्हापूर संस्थानापुरती मर्यादित न राहता संपूर्ण भारतभर विस्तारित होत गेली. यावरून शाहूंच्या कार्याची आणि दूरदृष्टीची जाणीव महत्व दिसून येते.

प्रश्न

दिर्घोत्तरी प्रश्न

1) मागास जाती किंवा लोकांच्या शैक्षणिक व सामाजिक उद्धारासाठी शाहू महाराजांनी केलेल्या सुधारणा स्पष्ट करा.

2) स्त्रियांच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी शाहू महाराजांनी केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

3) राजर्षी शाहू महाराज यांची वसतिगृह चळवळ स्पष्ट करा.

Short Notes

1) शाहूंनी मागास जातींच्या शैक्षणिक उद्धारासाठी केलेल्या सुधारणा
2) कनिष्ठ जातींच्या सामाजिक उद्धारासाठी शाहूंनी केलेल्या सुधारणा
3) शाहू महाराज व स्त्रियांचे हक्क अधिकार
4) वसतिगृह चळवळ